Here's the English translation of the Marathi text from the image:

**"A Study on Adolescents' Loneliness and the Need for Group Guidance."**

**Prof. Dr. Vishwakumar Baliram Shinde**

Tuljaram Chaturchand College, (Arts, Science, and Commerce) Baramati, Dist. Pune

### Abstract:

The study on adolescents' loneliness and the need for group guidance was conducted across 70 selected secondary schools (35 boys and 35 girls). Dr. R. R. Sharma has defined students' loneliness, and Dr. Vishwakumar Baliram Chavan discussed the importance of group guidance in mental health counseling (2009). The analysis highlights that the loneliness experienced by adolescents can be significantly reduced through group guidance, which also contributes to enhancing students' emotional well-being.

The study suggests that adolescents primarily face challenges related to academic pressure, expectations from family, and identity crises, which lead to feelings of loneliness. Group guidance can offer emotional support, companionship, and improve the social skills of students, helping them manage loneliness more effectively. This paper discusses the importance of group guidance in addressing adolescents' loneliness and its benefits for mental health.

### Introduction:

The mental well-being of students is crucial for the future of India. Adolescence is a formative stage where issues such as loneliness, fear, frustration, and stress are prevalent. It is important to address these issues through proper educational and psychological interventions. If students feel understood and supported, they can overcome challenges, leading to improved emotional stability. The loneliness among students is often a hidden problem; however, if not addressed, it may lead to disinterest in studies, lack of motivation, and emotional distress. Hence, this study attempts to understand adolescents' loneliness and the need for group guidance from a psychological perspective.

### Loneliness:

Loneliness is a mental state where adolescents feel isolated due to various factors, including lack of social connection, academic pressure, and family expectations. Adolescents often feel alienated due to the rapid social changes around them. The concept of loneliness includes several feelings, such as powerlessness, meaninglessness, and isolation, which have been defined by various psychologists.

According to Seeman (1959), loneliness consists of five main components:

1. Powerlessness
2. Meaninglessness
3. Normlessness
4. Isolation
5. Self-estrangement

The loneliness experienced by adolescents leads to feelings of low self-esteem, insecurity, and a lack of control, which affects their overall personality and behavior. (Smokoski & Kopasz, 2005)

---

Let me know if you need more detailed translations or additional sections translated.

MAH/NAN/10936/2015
ISSN : 2454-7905

SIDDHI
Siddhi Prakashan
Nanded

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

A Peer Reviewed - Referred
Belanagar, Near Maroti Mandir, Taroda (Kh.) Nanded - 431605 (Maharashtra, India)

Indexed SJIF

Impact Factor 7.479

ISSN 2454-7905
9 772454 790004 >

## Certificate of Publication

This is to certify that the review board of our research journal accepted the research paper / Article titled किशोरावस्थेतील मुलांचा एकाकीपणा आणि समुपदेशनाची गरज यांचा अभ्यास. of Dr./Mr./Miss/Mrs. प्रा.डॉ.विजयकुमार बलभिम शिंदे

It is peer reviewed and published in the issue LXXV Vol. I in the month of Dec. 2022

Thank you.

Pallavi

Editor in Chief
Pallavi L. Shete

आज़ादी का
अमृत महोत्सव

MAH/NAN/10936/2015
ISSN : 2454-7905
SJIF 2022 - Impact Factor : 7.479

[redacted]

**Year - 8, Vol. I, Issue- LXXV, Dec. 2022**

**- Cheif Editor -**

# Mrs. Pallavi Laxman Shete

[redacted]

# "किशोरावस्थेतील मुलांचा एकाकीपणा आणि समुपदेशनाची गरज यांचा अभ्यास."

प्रा. डॉ. विजयकुमार बलभिम शिंदे
(मानसशास्त्र विभागप्रमुख) तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, (कला,विज्ञान आणि वाणिज्य) बारामती.ता. बारामती जि.पुणे

**गोषवारा:-**

किशोरावस्थेतील मुलांचा एकाकीपणा आणि समुपदेशनाची गरज यांचा अभ्यास करण्यासाठी सहेतुक नमुना निवड पद्धतीने माध्यमिक विद्यालायातील 70 विद्यार्थ्यांची (35 मुले व 35 मुली) निवड केली. डॉ. आर.आर. शर्मा यांची विद्यार्थी एकाकीपणा चाचणी (1998) आणि डॉ. विजयालक्ष्मी चौहानव गुंजन अरोरा यांची मानसशास्त्रीय समुपदेशनाची गरज चाचणी (2009) यांच्या सहाय्याने प्रदत्त संकलन केले. पिअरसनच्या सहसंबंध गुणांकाद्वारे संख्याशास्त्रीय विश्लेषण केले असता किशोरवयीन मुलांमधील एकाकीपणा आणि समुपदेशनाची गरज यात धनात्मक सहसंबंध आढळून आला. त्याचबरोबर't' मूल्याच्या सहाय्यानेमुले आणि मुलींमधील एकाकीपणा आणि समुपदेशनाची गरज यांचा तुलनात्मक अभ्यास केला असता किशोरावस्थेतील मुलांच्या तुलनेत मुलींमध्ये एकाकीपणा जास्त असल्याचे दिसून आले, तर मुलींमध्ये मुलांच्या तुलनेत समुपदेशनाची गरज कमी असल्याचे दिसून आले. त्यामुळे प्रत्येक शाळेत स्वतंत्र समुपदेशकाची नेमणूक करावी असे सुचविण्यात येते.

**प्रस्तावना:-**

किशोरावस्थेतील विद्यार्थ्यांच्या मृत्यूमध्ये भारत अग्रस्थानी आहे. या वयोगटातील मुले व मुली यांच्यावरती पुढील काळात भारताचे भविष्य अवलंबून आहे.अशा तरुणांच्या समस्या त्यांच्यात येणाराएकाकीपणा,चिंता,ताणतणाव,वैफल्य अशाप्रकारच्या समस्या जास्त जाणवू लागल्या आहेत. किशोरावस्थेतील विद्यार्थामध्ये समस्यांचा शोध घेण्यासाठी मनोचिकित्सक मापनाची आवशकता असते. ज्याद्वारे त्यांना योग्य वेळी मदत मिळून त्याच्या समस्या सोडविता येतील परंतु बऱ्याच वेळी पालक आणि शिक्षक यांच्याकडून त्याबाबत दुर्लक्ष होते. विद्यार्थ्यांमधील एकाकीपणा ही एक अशीच समस्या आहे. जर हि समस्या वेळीच सोडवली नाही तर त्याचे रुपांतर आत्महत्या, व्यसनाधिनता आणि भावनीक, मानसिक विकृतीमध्ये होते. तर या अभ्यासातून किशोरावस्थेतील एकाकीपणा आणि मानसशास्त्रीय समुपदेशनची गरज यांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

एकाकीपणा :-

एकाकीपणा हि एक मनोसमाजिक प्रक्रिया आहे. यामधे किशोरावस्थेमध्ये संलगनतेचा अभाव,शालेय आणिकौटुंबिकवातावरणातकिंवापरिस्थितीत एकटे पडल्याचीभावना दिसते.किशोरावस्थेतील एकाकीपणाची प्रक्रिया हि किशोरावस्था चालू झाल्यापासून सुरु होते. कारण किशोरावस्थेचा कालखंड हा ताण तणावांचा कालखंड म्हणून ओळखला जातो. या अवस्थेत स्व-ओळख विकास प्रक्रियेत भावनिक अस्वस्थताआणि असुरक्षीतता,एकटेपणाची भावना निर्माण होते.(Berk, 2007)

Seeman (1959)यांनीएकाकीपणाचे पुढील पाच घटक संगितले आहेत.

1. शक्तीहीनता
2. अर्थहीनता
3. मानदंडहीनता
4. अलगतेचि भावना
5. स्व नाराजी

अशा किशोरावस्थेतील एकाकी मुले स्वत:ला शक्तीहीन समजतात व त्यांनास्वत:कडे आधिकार असावेत असे वाटते व त्यांची हि भवना जेव्हा नाकारलीजाते तेव्हा ते पालकांशी विचित्रपणे वागतात.(Smokoski & Kopasz, 2005)

मानसशास्त्रीय समपुदेशनाची गरज :-

रिचार्ड नेल्सन-जोन्स (2005)यांनी लाभार्थीमध्ये जीवनकौशल्यांची (Life skills) वृद्धी करणे याला फार महत्त्व दिले आहे. त्यांच्या मते, "समुपदेशन ही एक मानसशास्त्रीय प्रक्रिया असून त्याचा लाभार्थी आणि समुपदेशक या दोघांच्याही मानसिकतेवर परिणाम होतो. तसेच, दोघेही परस्परांच्या मानसिकतेवर परिणाम करीत असतात. त्यामुळे लाभार्थीत बदल होऊन तो स्वत:च्या समस्या स्वत:सोडविण्यास समर्थ होतो."

जॉन मॉकलिओड (2007) यांनी लाभार्थी आणि समुपदेशक यांच्यामधील संबंधाला त्यांच्या व्याखेत प्रमुख स्थान दिले आहे.त्यांच्या मते, "समुपदेशन अशी एक क्रिया आहे, ज्यात एखादी त्रस्त व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीला आमंत्रण देते आणि विशिष्ट प्रकारे दोघांमध्ये संबंध प्रस्थापित करण्यास मोकळीक देते."

विद्यार्थ्यांमधील समपुदेशन गरजेचा शोध घेणे हे विविध दृष्टीने फायद्याचे आहे. यामध्येविद्यार्थ्यांसाठी त्यांच्या गरजेनुसार लहान किवा मोठ्यासमूहासाठीचेसमपुदेशन कार्यक्रम तयार करणे.विद्यार्थ्यांमधील वैयक्तीक समपुदेशनाची गरज शोधणे व ती त्यांना पुरविणे.विद्यार्थ्यांना त्यासंबंधी प्रशिक्षित करणे. शाळेतीलविद्यार्थ्यांसाठी समुपदेशनाच्यागरजेविषयीछोटेसे संशोधन करणेआणि परिणामकारक समुपदेशन पद्धातीचाशोध घेणे.(Aluende,2001, Nicholas,1995)त्यामुळे विद्यार्थ्यांमधीलसमुपदेशन गरज शोधणेही समुपदेशकांना नवीन समुपदेशन कार्यक्रमाची निर्मिति करणे आणि पूर्वीच्या समुपदेशन कार्यक्रमामध्ये आदश्यकतेनुसार भर घलण्यासाठी सहाय्यभूत ठरेल.(Chaturvedi, 2004).

संशोधनाची उद्दीष्टे:-

1) किशोरावस्थेतील विद्यार्थ्यांच्याएकाकीपणाचा अभ्यास करणे.

2) किशोरावस्थेतील विद्यार्थ्यांमधील मानसशास्त्रीय समुपदेशनाची गरज याचा अभ्यास करणे.

3) किशोरावस्थेतील विध्यार्थ्यांतील एकाकीपणा आणि मानसशास्त्रीय समुपदेशनाची गरज यांचा सहसंबंधात्मक अभ्यास करणे.

अभ्युपगम :-

१) किशोरावस्थेतील विद्यार्थ्यांमधील एकाकीपणा आणि मानसशास्त्रीय समुपदेशनाची गरज यांच्यात धनात्मक सहसंबंध आढळून येतो.

पूर्वसंशोधन साहित्य :-

Nkechi (2016) त्यांनी घेतलेल्या पूर्व संशोधनाची अढाव्यावरून त्यांना असे आढळून आले की समुपदेशनामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो तसेच भविष्याबाबत तेसकारात्मक ध्येय ठेवतात.

Kacirellhan (2015) यांनी विद्यार्थ्यांमधील एकाकीपणाची पातळी आणि त्यांचा सर्वसाधारण समाधानावर होणारा परिणाम अभ्यासला असता, त्यांना असे दिसून आले की,विद्यार्थ्यांमधील सर्वसाधारण समाधानात त्यांच्यातील एकाकीपणाची पातळी कारणीभूत ठरते.

Karimi,J.(2014) यांनी केनियन विद्यापीठातील विद्यार्थ्यांमधील समुपदेशनाची गरज अभ्यासली असता त्यांना असे दिसून आले कि विद्यापीठामध्ये शैक्षणिक, वैयक्तीक आणि जीवनकौशल्य या तीन गटात समुपदेशनाची गरज आहे.

Shrivastav, A. & Mukhopadhyay, A. (2009) यांनी किशोरावस्थेतील मुलांची एकाकीपणाची पातळी आणि भावनिक बुद्धिमत्ता यांचा अभ्यास केला असता, त्यांना एकाकीपणाची पातळी अधिक असलेले किशोर भावनिक दृष्ट्या अक्षम असल्याचे दिसून आले.

Davies (2004) यांना अभ्यासातून असे दिसून आले की भावनिक खुलेपणावरील मर्यादेमुळे कॉलेजमधील युवक मदत मागण्यापासून दूर असतात. त्यामुळे समुपदेशनाच्या गरजेची पूर्तता होत नाही.

Lapan, Gysbeers & Petroski (2003).यांनी समुपदेशन कार्यक्रमाचा प्रभावीपणे अंमलबजावणीचा परिणाम आभ्यासला असता, त्यांना असे दिसून आले की, प्रभावी समुपदेशन कार्यक्रमाचा प्रत्यक्ष आणि प्रभावी परिणाम म्हणून त्याचा सुरक्षिततेवर होतो.

Borgen and Amundeon (2001).यांच्या किशोरावरील अभ्यासातून त्यांनी असे सुचवले की, व्यवसायिक समुपदेशनाची मोठ्या प्रमाणावर गरज आहे.ज्यातून तरुणांमधील विकासात्मकगरजांची पूर्तता होईल. बदलत्या सामाजिक, आर्थिक परिस्थितीत वैयक्तीक आणि व्यावसायिक समुपदेशनाची गरज असल्याचे सांगितले.

संशोधन पध्दती

समस्या :-

"किशोरावस्थेतील विद्यार्थ्यांतील एकाकीपणा आणि मानसशास्त्रीय समुपदेशनाची गरज यांचा सहसंबंधात्मकअभ्यास करणे."

परिवर्तके :-

१)एकाकीपणा.

२) मानसशास्त्रीय समुपदेशनाची गरज.

संक्रीयात्मक व्याख्या :-

1.) एकाकीपणा :-

डॉ. आर.आर. शर्मा यांच्या एकाकीपणा या चाचणीवरील किशोरावस्थेतील विद्यार्थ्यांचा आलेला गुणांक म्हणजे एकाकीपणा होय.

2) मानसशास्त्रीय समुपदेशनाची गरज :-

डॉ. विजयालक्ष्मी चौहान आणि गुंजन अरोरा यांच्या मानसशास्त्रीय समुपदेशनाची गरज या चाचणीवरील किशोरावस्थेतील विद्यार्थ्यांचा आलेला गुणांक म्हणजे मानसशास्त्रीय समुपदेशनाची गरज होय.

संशोधनाचा आराखडा :-

प्रस्तुत संशोधनासाठी सहसंबंधात्मक आराखडा वापरण्यात आलेला आहे.

नमुना:-

प्रस्तुत अभ्यासासाठी सहेतुक पद्धतीने बारामती तालुका व परिसरातील शाळेतून 70 माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांची निवड केली. त्यांच्या वयोगट 14 ते 18 आहे. एकूण प्रदत्तापैकी 35 मुले व 35 मुली आहेत.

प्रदत्त संकलन पध्दती :-

प्रदत्त संकलन करण्यासठी संशोधकाने सुरुवातीला शाळा प्रशासनाची रीतसर परवानगी घेतली. त्यानंतर संशोधनाचा उद्देश आणि विषय विद्यार्थ्यांना समजावून सांगितला जेणेकरून त्यांचे सहकार्य मिळेल. त्यानंतर त्यांना प्रत्यक्ष चाचणी सोडवण्यास देण्यापूर्वी त्यांना विश्वासात घेतले की, त्यांनी दिलेली माहिती संशोधनासाठीच वापरली जाईल त्यामुळे त्यांनी खरी माहिती दयावी. त्यानंतर प्रत्यक चाचणीच्या सुरुवातीला प्रमाणित सूचना दिल्या व त्यांच्याकडूनचाचण्या सोडवून घेतल्या.

संशोधनाची साधने:-

1)विद्यार्थी एकाकीपणाची चाचणी(1998).

डॉ. आर.आर.शर्मा यांनी तयार केलेली असून यामध्ये एकूण 54 विधाने आहेत. प्रत्यक विधानाला सहमत आणि असहमत असे दोन पर्याय आहेत. चाचणीची चाचणी पुनःचाचणी विश्वसनीयता .75 तर अर्ध विच्छेद पद्धतीनुसार .61 आणि के. आर. पद्धतीनुसार .84 एवढी आहे . चाचणीची यथार्थता समाधान कारक आहे .

2) मानसशास्त्रीय समुपदेशनाची गरज चाचणी (2009).

डॉ. विजयालक्ष्मी चौहान आणि सौ.गुंजन अरोरा यांनी तयार केलेली असून, या चाचणीमध्ये एकूण 25 विधाने आहेत. प्रत्येक विधानाला नेहमी, अनेकदा, कधीतरी, क्वचीत आणि कधीच नाही असे पाच पर्याय आहेत. त्यापेकी 21 विधाने सकारात्मक आहेत . त्यांचे गुणांकन दरील पर्यायानुसार 5, 4,3,2,1 असे करावयाचे आहे तर उरलेली 4 विधाने नकारात्मक असून त्यांचे गुणांकन सकारात्मक विधानाच्या गुणांकनाच्या विरुद्ध पद्धतीने करावयाचे आहे . चाचणीसाठीची अर्ध विच्छेद विश्वसनीयता गुणांक .90 तर आशय यथार्थता .82 एवढी आहे. चाचणी गुणांकनाच्या विश्लेषणासाठी शतमक हे मानदंड वापरले आहे.

प्रदत्तविश्लेषण:-

**प्रस्तुत संशोधनात संशोधकाने मिळालेल्या प्रदत्ताचे वर्णनात्मक विश्लेषण करण्यासाठी मध्यमान,प्रमाणविचलन आणि सहसंबंध गुणांक यांचा वापर केला आहे.**

फलिते आणि चर्चा :-

तक्ता क्र. 1

एकूण प्रदत्ताचे मध्यमान आणि प्रमाण विचलन.

| परिवर्तके | N | मध्यमान | प्रमाण विचलन |
|---|---|---|---|
| विद्यार्थ्यांमधील एकाकीपणा | 70 | 21.66 | 4.61 |
| मानसशास्त्रीय समुपदेशनाची गरज | 70 | 70.55 | 7.11 |

वरील तक्ता क्र. 1 मध्ये किशोरावस्थेतील विद्यार्थ्यांमधील एकाकीपणाचे मध्यमान 21.66 व प्रमाणविचलन 4.61 एवढे आहे. तर मानसशास्त्रीय समुपदेशनाची गरज याचे मध्यमान 70.55 व प्रमाणविचलन 7.11 एवढे आहे.

तक्ता क्र. 2.

किशोरावस्थेतील विद्यार्थ्यांमधील एकाकीपणा आणि मानसशास्त्रीय समुपदेशनाची गरज यामधील सहसबंध गुणांक.

| परिवर्तके | एकाकीपणा | मानसशास्त्रीय समुपदेशनाची गरज |
|---|---|---|
| विद्यार्थ्यांमधील एकाकीपणा | 1 | 0.58** |
| मानसशास्त्रीय समुपदेशनाची गरज | 0.58** | 1 |

*Significant at 0.05 level

** Significant at 0.01 level

वरील तक्ता क्र.2 वरून असे दिसून येते की किशोरावस्थेतील विद्यार्थ्यांमधील एकाकीपणा आणि समुपदेशनाची गरज या दोन परिवर्तकांमध्ये धनात्मक सहसंबंध आहे. सहसंबंध गुणांक मुल्य 0.58 एवढे आलेले आहे. हे मुल्य0.01 या लक्षणीय पातळीला सार्थ आहे. यावरून आपल्याला असे म्हणता येईल की किशोरावस्थेतील विद्यार्थ्यांमधील एकाकीपणा वाढला असता समुपदेशनाची गरज जाणवते.

Borden & Amendon यांच्या अभ्यासातून ही असे दिसून आले आहे की ,किशोरावस्थेतील विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक समुपदेशनाची मोठ्या प्रमाणावर गरज आहे . तर karimi,J. 2014 यांनीही विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक, व्यावसायिक जीवनाकौशल्या बाबत समुपदेशनाची गरज जाणवली. आणि Shrivastv &Mukopadhyay यांना एकाकीपणा अधिक असलेले किशोर भावनिक दृष्ट्या अक्षम असल्याचे दिसून आले. वरील चर्चेवरून हा अभ्युपगम स्वीकारला जातो आहे.

निष्कर्ष :-

किशोरावस्थेतील विद्यार्थ्यांमधील एकाकीपणा आणि मानसशास्त्रीय समुपदेशनाची गरज यांच्यात धनात्मक सहसंबंध आढळून आला आहे .

पाययोजना :-

1)किशोरांमधील एकाकीपणाच्या लक्षणांबाबत पालक आणि शिक्षकांमध्ये जागृकता करणे. एकाकीपणा असणाऱ्या विद्यार्थ्यांचा शोध घेणे व त्यांना समुपदेशन करणे.

2)शाळांनी विद्यार्थ्यांमधीलविविध क्षेत्रातील समुपदेशनाची गरज सातत्याने तपासणे व त्यांच्या गरजानुसार समुपदेशन कार्यक्रमाची निर्मिती करावी.

संदर्भ सूची :-


1) Alued,o.o.(2001). Factors influncing students unrest In Tertiary Institutions in Edo state of Nigeria. *Education Research Quarterly*;24 (3) 10-27.DOi:14.1227/s 0827-030-7300-4.
2) Berk,L.E.(2007).Development through the life span. (4th.ed.) Bostan. MA:Allyn & Bacon.
3) Borgen,W. and Amundeon,N.(2001).Anexpended view of work with adolescents-promoting Competence. *Readings for child And Youth care workers,* 27 (4).
4) Chaturvedi,R.(2004). Guidance and Counselling for School Students. Orescent Publishing corporoation. New Delhi.

5) Chohan,V., & Arora,G. (2009). Manual of Psychological Need of Counseeling scale, National Psychological Publication , Agra.
6) Davies et al. (2004).In Adolscent. males views on use of mental health Counselling services. *Adolesence*.Spring.
7) Kacire Ilhan. (2015). The impout of the University Sudents Level of Alienation on their perception of General Satisfaction. *International Journal of higher Educationvol 5No.1*. 38-46.
8) Karimi,J.Muthaa,G, Bururia,D, Karimi,V., & Mburugu,B.(2014). Assessment of CounsellingNeed among Students in Keniyan Universites.*Journal of Education and practice.*
9) Lapan,R.T. Tucker,B., Kim,S., & Kosciulk,J.F.(2003). Preparing rural adolesent for post-high school transitions. *Journal of counceling and development,81*. 329-242.
10) McLeod,Johan (2007). Counselling Skills. New Delhi :Rawat Publications.
11) Nkechi,E.E.Ewomaoghene,E.E.& Nkechi,E.(2016).The role of guidance and counselling in effective Teaching and learning schools. *International Journal of Multidisciplinary studies. vol.1* pp 36-48.
12) Schulz,L.L.(2007). The experience of alienation for males ages 16-19 from high school in the pacific Nortwest: A phenomenological inquiry. Dissertattion Absracts, orggon state university. http://ir.library.oregonstat.edu/jspui/handle/1957/3868.
13) Seeman,M.(1959).On the meaning of Alienation, *American sociological Review*, vol. 24.
14) Sharma,R.R.(1988). Manual of Student Alienation Scale. Ankur Psychological Agencey, Lucknow.
15) Smokwski,P.R.,& Kopasz,K.H.(2005). Bullying in school: An overview of types, effects, family characteristics, and intervention strategies. *children & schools, 27(2),* 101-110.